# पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर, से. १०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई

email- establishmentbr-nm@mahapolice.gov.in

क्र.पोआ/नमुं/आस्था-६/पोलीस भरती -२०२४-२०२५/ ९४ /२०२६, नवी मुंबई, दिनांक :- २७/०३/२०२६.

## पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ च्या लेखी परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांना सुचना

नवी मुंबई घटकाच्या पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ च्या लेखी परिक्षेच्या अनुषंगाने दिनांक २६/०३/२०२६ रोजी नवी मुंबई पोलीस संकेतस्थळावर उमेदवारांना सुचना प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदरची लेखी परीक्षा डी.वाय.पाटील स्टेडीयम, सेक्टर-७, नेरुळ, नवी मुंबई येथे घेण्यात येणार असुन उमेदवारांची बैठक व्यवस्था खालीलप्रमाणे राहिल.

| Sr.No. | Bay | Seat No. | Sr.No. | Bay | Seat No. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | A | 100001 TO 100344 | 9. | I | 102501 TO 102654 |
| 2. | B | 100345 TO 100682 | 10. | J | 102655 TO 102986 |
| 3. | C | 100683 TO 101014 | 11. | K | 102987 TO 103318 |
| 4. | D | 101015 TO 101346 | 12. | L | 103319 TO 103650 |
| 5. | E | 101347 TO 101678 | 13. | M | 103651 TO 103982 |
| 6. | F | 101679 TO 102010 | 14. | N | 103983 TO 104314 |
| 7. | G | 102011 TO 102342 | 15. | O | 104315 TO 104656 |
| 8. | H | 102343 TO 102500 | 16. | P | 104657 TO 104996 |

१. वरीलप्रमाणे संबधीत Bay अंतर्गत बैठक व्यवस्था स्टेडीयमच्या मुख्य प्रवेश द्वारावर तसेच संबधीत Bay च्या प्रवेशाच्या ठिकाणी लावण्यात आलेली आहे.

२. उमेदवारांचे लेखी परिक्षेचे, मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र तपासुन स्टेडीयममध्ये सर्व्हिस रोड वरील मुख्य प्रवेश द्वारातुन प्रवेश देण्यात येईल.

३. प्रवेश दिल्यानंतर उमेदवारांना त्यांचे सामान ठेवण्याकरीता क्लॉक रुमची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर ठिकाणी सामान ठेवल्यानंतर कुपनची एक प्रत सामानास बांधुन दुसरी प्रत उमेदवारास देण्यात येईल. उमेदवाराने सामान त्यांचे जबाबदारीवर ठेवायचे आहे.

४. उमेदवारास बैठकीच्या ठिकाणी Writing pad, काळ्या शाईचा पेन व पाण्याची बॉटल उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी सोबत केवळ लेखी व मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र, २ फोटो व ओळखपत्र (आधारकार्ड / पॅनकार्ड / वाहन चालक परवाना इत्यादी) एवढेच घेवुन पुढे जायचे आहे.

५. तद्नंतर उमेदवारास नोंदणी कक्षाकडे प्रवेश दिला जाईल. त्याची बायोमॅट्रीक पडताळणी करुन हजेरी पटावर फोटो चिकटवुन स्वाक्षरी घेण्यात येईल व विहित मार्गाने बैठकीच्या Bay कडे जाण्याकरीता प्रवेश देण्यात येईल.

६. उमेदवाराच्या बैठकीच्या ठिकाणी पिवळ्या स्टिकरवर त्यांचा सिट क्रमांक लावण्यात आला असुन पांढऱ्या स्टिकरवर त्यांचा चेस्ट क्रमांक लावण्यात आला आहे. उमेदवारांनी त्यांचे हॉल टिकीटवरील सिट क्रमांक व चेस्ट क्रमांक तपासुन त्याच खुर्चीवर बसावे.

७. उमेदवारांच्या बैठकीच्या ठिकाणी चेस्ट क्रमांक ठेवण्यात येणार असुन, बैठकीच्या ठिकाणी पोहोचताच त्यांनी सदरचा चेस्ट क्रमांक परिधान करावयाचा आहे.

८. परिक्षा कालावधीत पर्यवेक्षकांकडुन देण्यात येणाऱ्या सर्व सुचनांचे तसेच उत्तरपत्रिकेवर व लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या सुचनांचे उमेदवारांनी तंतोतंत पालन करावे.

Sanjaykumar Surgounda Patil

Digitally signed by Sanjaykumar Surgounda Patil
Date: 2026.03.27 22:33:34 +05'30'

दिनांक :- २७.०३.२०२६

ठिकाण :- नवी मुंबई.

(संजयकुमार पाटील)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई